| 27 | या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षती / हानी झाल्यास द्वितीय पक्ष क्षतिपूर्तीची हमी देत आहे. |
| 28 | द्वितीय पक्षीय यांनी त्यांना दिलेले काम मध्येच खंडीत केले किंवा करारनाम्यातील अटीशती चा भंग केल्यास द्वितीय पक्षीय यांच्या सोबत केलेला करारनामा रद करून द्वितीय पक्षीय यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांस राहील. |
| 29 | करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील. |
| 30 | महाराष्ट्र मुद्रांक शुल्क कायदा अन्वये सदर करारनाम्यासाठी योग्य ते मुद्रांक शुल्क (Stamp Duty) भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील. |
| 31 | सदर ठेक्याच्या संपूर्ण प्रक्रियेत ठेक्यासंदर्भात सादर करण्यांत आलेली सर्व कागदपत्रे दस्तऐवज निविदा फॉर्म ही करारनाम्याचा एक भाग समजण्यांत येईल. |

| | |
|---|---|
| | सदर ठेक्याच्या संपूर्ण प्रक्रियेत ठेक्यासंदर्भात सादर करण्यांत आलेली सर्व कागदपत्रे दस्तऐवज निविदा फॉर्म ही करारनाम्याचा एक भाग समजण्यांत येईल. |
| 2 | मासिक ठेकेदार यांना वस्तु व सेवा कराचा भरणा करणे बंधनकारक आहे. ठेकेदार यांनी करारनामा केल्यानंतर वस्तु व सेवा कर व इतर शासकीय कराचा भरणा करण्यास कसूर केल्यास सदरची रक्कम अनामत रक्कमेमधुन वसुल करणेत येईल. |
| 3 | मनपामार्फत बांधा वापरा हस्तांतरीत करा (BOT तत्वावर) काही ठिकाणी मार्केट विकसित करण्यात आलेले आहे. तसेच काही ठिकाणी मार्केट बांधण्याची प्रक्रीया सुरु आहे. तरी सदर BOT तत्वावरील मार्केट मध्ये रस्त्यावरील व्यवसाय करणारे लाभार्थी यांचा समावेश होणारी संख्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाच्या अनुषंगाने विचारात घेऊन विषयांकित कामाकरिता नेमण्यात येणाऱ्या ठेकेदाराची भरावयाच्या बाजार फी हप्त्यात त्यानुसार सवलत देण्यात येईल, त्यामुळे यशस्वी ठेकेदार यांना BOT तत्वावरिल मार्केट मध्ये बसणाऱ्या फेरीवाल्याकडुन बाजार फी वसुल करता येणार नाही, ज्या दिनांकास जेवढे फेरीवाले मार्केटमध्ये स्थलांतर होतील, तेवढी रक्कम वार्षिक अंतिम मंजूर देयक रक्कमेतून कमी करण्यात येईल. तसेच त्या लाभार्थिकडून बाजार फी वसूल करता येणार नाही. |
| 34 | आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुली बाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील |
| 35 | ठेकेदार यांनी हप्त्यांची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास किंवा बाजार फी वसुली चे काम करणेस थांबविल्यास व्दितीय लिलाव करण्याचा महानगरपालिकेला पूर्ण अधिकार राहील. व्दितीय लिलाव केल्या नंतर कमी दराने करारनामा करावा लागल्यास व महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई या प्रथम लिलाव घेणा-या ठेकदाराकडुन वसुली केली जाईल. त्याकरिता प्रथम ठेकेदार / अभिकर्ता यांस महापालिकेविरुध्द दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. |
| 36 | बाजारात बसणा-या विक्रेत्याकडून महानगरपालिका नियमानुसार बाजार फी वसुल करावी लागेल. दमदाटीने/वाजवी बाजार फी पेक्षा जास्त/बाजार पावती न देता बाजार फी वसुली केल्यास ठेकेदारावर नियमानुसार कडक कारवाई केली जाईल. |
| 37 | महानगरपालिका हददीत कोणत्याही ठिकाणी बाजार भरला तरी महानगरपालिका ठरवुन देईल त्या कंत्राटदाराशिवाय इतर कोणासही बाजार फी वसुली करण्याचा अधिकार नाही. |
| 38 | सध्या व पुढे ज्या प्रमाणात जागा राहील व महानगरपालिका दाखविल त्याच जागेवरुन बाजार फी वसुल करावी लागेल. त्यामध्ये महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. |
| 39 | बाजार फी ची वसुली सौजन्याने व सहनशिलतेने करावी लागेल. |
| 40 | महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केटमध्ये बसणा-या मासळी /मटण/फळ/भाजी विक्रेत्याकडुन बाजार फी वसुल करता येणार नाही. |
| 41 | ठेकेदारामार्फत बाजार फी वसुली करणा-या कर्मचा-याकडे बाजार फी वसुली बाबतचे ओळखपत्रा शिवाय वसुली केली गेल्यास ठेकेदाराविरुध्द महापालिकेमार्फत कारवाई केली जाईल. |
| 42 | महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी हयांना बाजार फी वसुलीच्या पावत्या तपासण्याचा अधिकार राहिल. |

| | |
|---|---|
| 3 | पथ विक्रेता संरक्षण कायदा 2014 च्या तरतुदीच्या अधिन राहून ही निविदा मागविण्यात येत आहे. या कायदयाअंतर्गत पारीत होणारे /झालेले आदेश निर्णय ठेकेदारावर बंधनकारक राहतील |
| 4 | उपरोक्त अटी शर्तीमध्ये कोणत्याही वेळी, कोणतीही अट समाविष्ठ करणे अथवा अंशतः किंवा पुर्णतः काढुन टाकणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांचेकडे राहतील. |

वरील सर्व अटीशर्ती उभय पक्षीय यांनी वाचून मान्य केल्या असून त्याप्रमाणे उभयपणे सहया रण्यांत येत आहे.

दिनांकः / /

स्थळः भाईंदर (प.)

करारनामा लिहून घेणार

(श्री.अजित मुठे)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानरपालिका
(प्रथम पक्षीय)

IREE GAJANAN ENTERPRISES
Proprietor

ारनामा लिहून देणार
श्री. गजानन इंटरप्रायजेस्
ंदर (पश्चिम)

क्षीदारः

सन २०२२-23 / करारनामा रजिस्टर
अनु. क्रं. ४९२ दि.२३/८/२२ अन्वये
नोंद करणेत आली.

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२००८

प्रकरण क्र. २७ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करणे आणि नॉ-फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाल्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये काढून टाकणे.

ठराव क्र. २९.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये विना परवानगी चालू असलेल्या फेरीवाल्यांना व सार्वजनिक ठिकाणी विक्री करणाऱ्या व्यक्तींना नोटीस न देता काढुन टाकण्याची तरतुद आहे. अशाप्रकारे महानगरपालिका हद्दीत कार्यवाही करणेपूर्वी फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र ठरविणे आवश्यक आहे. तसेच शहरातील जनतेच्या अडचणीचा व रहदारीचा विचार करता शहरातील काही भाग हा फेरीवाला मुक्त करणे आवश्यक आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्राचे धोरण ठरविताना यापूर्वी याबाबत वेळोवेळी झालेल्या मा. स्थायी समिती व मा. महासभेच्या निर्णयाचा तसेच या विषयी स्थापन करण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या समितीच्या अहवालाचा विचार करता विभाग निहाय खालीलप्रमाणे फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र करावे.

### १) भाईंदर (पश्चिम) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्रं | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोदी पटेल नाका ते भाईंदर सेकंडरी स्कुल ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान) | डॉ. आंबेडकर रोड महावीर अपार्टमेंट ते बि... पॅलेस रस्त्यापर्यत. |
| २ | पोलिस स्टेशन भाईंदर रेल्वे फाटक पर्यतचा रस्ता. | राम मंदीर मार्ग पोलिस स्टेशन ते जैन मंदीर फुटपाथवर बैठकी विक्रेते |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुट रोड) बावन जिनालय जैन मंदिर ते बनी पॅलेस पर्यतचा रस्ता. | शास्त्री नगर रस्त्याची डावी बाजू. रेल्वे समोर कमला पार्क व वालचंद कॉम्पलेक्स |
| ४ | बावन जिनालय परिसर. | प्रकाश मार्केट ते जोशी निकेतन रस्त्याची बाजू. रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रेते बिल्डींगपर्यत. |
| ५ | जे. एच. पोद्दार हायस्कूल रोड. | चर्च ते महानगरपालिका कार्यालय (... बाजार ते मोती नगर) |
| ६ | महाराजा अग्रसेन मार्ग. | भाईंदर (प.) येथे आठवडयाच्या बाजार वरील दिलेल्या रस्त्यांवर फेरीवाले बसवता परवानगी देण्यांत येत आहे. |
| ७ | जयप्रकाश नारायण मार्ग. | सदासत्य अपार्टमेंट ते अमृतवाणी रस्त्याच्या डाव्या बाजूस. |
| ८ | स्टेशन रोड ते बालाजी वसाहत ते रेल्वे पादचारी पुल, विनायक मंदीर मार्ग. | |
| ९ | भाईंदर स्टेशन ते पोलीस चौकी. | |
| १० | जनता नगरकडे जाणारा रस्ता. | |
| ११ | राममंदीर रोड | |
| १२ | मोदी पटेल रोड | |
| १३ | जैन मंदीरच्या बाजूने देवचंद नगरकडे जाणाऱ्या ... | |

सत्य प्रत

नगर सचिव

| | | |
|---|---|---|
| १५ | ९० फुट रोड, रजिस्ट्रेशन ऑफिस समोरचा रस्ता | |

## २) भाईंदर (पूर्व) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका ते गोडदेव उद्यान सभोवताली (बी. पी. रोड) | भाजी मार्केट खारीगांव |
| २ | गोडदेव नाका ते नवघर नाका, गोडदेव तलाव परिसर, गोडदेव नाका ते अभिनव नाका नवघर फाटक रोड दोन्ही बाजू. | नवघर गावाजवळ इंदीरा नगरकडे (कुणाल कुटीर ते नवघर स्मशान रस्त्याची उजवी बाजू). |
| ३ | बंदरवाडी नाका ते कृणाल कुटीर नवघर रोड. (नवघर नाका) | नवघर गावाकडे जाणारा रस्ता. |
| ४ | बंदरवाडी नाका ते हॉटेल प्रशांत (रेल्वे समांतर रस्ता) | इंद्रवरुण हॉल ते रेल्वे समांतर खाडी पर्यंत |
| ५ | साई बाबा मंदीर ते गोडदेव नाका (गोडदेव फाटक रोड) | आर. एन. पी. पार्क चिंतामणी अपार्टमेंट. |
| ६ | बंदरवाडी नाका ते जेसल पार्क जैन मंदीर पर्यत. | परब मसाले ते साधुराम हॉटेल. |
| ७ | भाईंदर (पूर्व) फाटक चर्च ते केबीन रोड | नर्मदा कुंज (रावल नगर) ते सुलभ शौचालय उजवी बाजू. |
| ८ | पानटेकडी रोड (शिर्डी नगर रोड ते गोडदेव स्मशान भूमी रोड) | राम गोपाल बिल्डींग ते शितल अपार्ट. रस्त्याची उजवी बाजू. |
| ९ | केबिन रोड नाका ते नर्मदा नगर मधून एम. आय. उद्योग नगर पासून अभिनव स्कूल नाका पर्यत जाणारा रस्ता. | हनुमान नगर एक बाजू. |
| १० | नवघर क्रॉस रोड. | |
| ११ | भाईंदर (पूर्व) विजय पंजाब ते खारीगांव सत्यनारायण मंदीर ते रामगोपाल सदन केबीन रोड पर्यत. | |
| १२ | इंद्रवरुण हॉल ते जैन मंदिराची एक बाजू. (जेसल पार्ककडे जाणारा एक रस्ता) | |
| १३ | खारी तलाव रोड | |
| १४ | बंदरवाडी नाका ते जैन मंदीर डीवाईन शेल्टर/ कपूर टॉवर पर्यत. | |
| १५ | के. दत्तु म्हात्रे मार्ग (न्यु गोल्डन नेस्ट १०० फुटी रोड) | |
| १६ | दिपक हॉस्पीटल मार्ग. | |
| १७ | हनुमांन मंदिर ते एस.एन. कॉलेज. | |
| १८ | राहूल पार्क ते आर.एन.पी. पार्क. | |
| १९ | जागृती अपार्टमेंट ते रावल नगर ते नर्मदा कुंज. | |
| २० | नवघर क्रॉस रोड (एस.व्ही. रोड) | |
| २१ | नारायण मार्बल ते आयुक्तांच्या बंगल्या रस्ता | |
| २२ | धनेश हॉटेल ते तलाव रोड ते गांवदेवी मंदिर परिसर. | |
| २३ | साईबाब नगर किरण नाला (नवघर क्रॉस रोड) | |

## ३) मिरारोड विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.) फाटक ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या पर्यत. | नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग समोर फक्त |
| २ | शांतीनगर संकुलनाचे प्रवेशव्दार ते एस.के. स्टोन पर्यंतचा रस्ता. | नरेंद्र पार्क इ-५ बिल्डींग ते मेघदुत बिल्डींग पर्यंत |
| ३ | मिरारोड स्टेशन पासून नयानगरकडे जाणारा रस्ता. | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. २ व १० मधील बाजू. सेक्टर-२ च्या बाजूची. |
| | पोस्ट ऑफीस राजधानी अपार्ट. ते नाल्यापर्यतचा रस्ता. | नया नगर रोहित बिल्डींग ते सिता पार्क गेट एक बाजू. |
| ४ | चंद्रेश निकेतन बिल्डींग लोढा मेहतीया नगर / शॉपींग सेंटर आणि उलफत | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. ३ आणि ५ मधील एक बाजू. सेक्टर-३ च्या बाजुची. |

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| | मंझील पर्यंत. | |
| ६ | शांतीनगर सेक्टर ११ पाण्याची टाकी ते सृष्टीकडे जाणारा रस्ता. | पुजा नगर समोर [illegible] गल्ली एक बाजू. |
| ७ | मिरा रोड स्टेशन शांतीनगर गेट ते शितल नगर नाकापर्यंत | शांतीनगर सेक्टर-६ व फेस-३ मधील एक बाजू सेक्टर-६ च्या एक बाजू |
| ८ | मिरारोड स्टेशन नयानगर रिक्षास्टँड ते शितल नगर नाकापर्यंत | नीदा पार्क ते [illegible] बिल्डींग पर्यंत एक बाजू. |
| ९ | पोस्ट ऑफीस मिरा रोड ते शांतीनगर सेक्टर क्र. १ ते ४ मधील दोन्ही बाजू | सेक्टर नं. ५ सी-३८ [illegible] ते बी-२६-२७ एक बाजु. |
| १० | शांती नगर सेक्टर क्र. ३ ते ६ मधून सृष्टीकडे जाणारा रस्ता दोन्ही बाजू. | |
| ११ | शितल नगर नाका ते जांगीड कॉम्प्लेक्स दोन्ही बाजू. ते सिल्वर पार्क सिग्नलपर्यंत दोन्ही बाजू. | |
| १२ | सेक्टर नं. ६, बी-१ ते अे-७ पर्यंत एक बाजू. | |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. १ व २ मधील रस्ता | |
| १४ | शांतीनगर सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| १५ | मिरारोड पूर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स मधील अंतर्गत रस्ता | |
| १६ | गणपती मार्बल ते रामदेव पार्क पर्यंतचा रस्ता. | |
| १७ | शांतीनगर सेक्टर नं. ३ व ४ मधील रस्ता | |
| १८ | सृष्टी सेक्टर नं. ५ व ३ मधील रस्ता | |
| १९ | सृष्टी सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| २० | रॉयल गार्डन हॉटेल ते सिल्वर पार्क सिग्नल पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला. | |
| २१ | मिरारोड पूर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर, बिल्डींग शेवटच्या दुकानापासून ते अस्मिता व्हिनटेज पर्यंत दोन्ही बाजू. | |
| २२ | नयानगर हैदरी मस्जिद ते संघवी एम्पायर पर्यंत. | |
| २३ | मिरारोड पूर्व नयानगर मिरा नर्सिंग होम गल्ली झुबेदा बिल्डींग ते ऑर्चीड बिल्डींग पर्यंत दोन्ही बाजू. | |

### ४) काशीमिरा, मिरा गावठण व इतर हायवे लगत क्षेत्र

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | मिरा गावाच्या हायवे लगतचा रोड. | मिरागाव टॅक्स ऑफिस पासून ते पटेल प्लाझा इमारती पर्यंत. |
| २ | मिरा गावाकडे जाणारा रस्ता. | |
| ३ | नि. कम्पल ते लिबर्टी तबेल्यापर्यंत जाणारा रस्ता ते गांवदेवी मंदिर मार्ग. | |
| ४ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८. (दहिसर चेकनाका ते वर्सोवा नाका) | |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापसून ते उड्डाण पुलापर्यंत मिरा भाईंदर मुख्य रस्ता व फाटक पर्यंत. | |

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ३० फुट व त्यापेक्षा रुंद असणारे सर्व रस्ते ना फेरिवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावा.

वरील प्रमाणे महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेत आले आहे. ना-फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसण्यांस मनाई असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ... अन्वये ना-फेरीवाला क्षेत्रातील बसणाऱ्या फेरीवाल्यांना त्याठीकाणाहुन काढून टाकण्यांत यावे. अशा ... करता त्यांच्यावर दंडात्मक कायदेशीर कारवाई

सत्य प्रत

मिरा रोड ते चेणा विभागातील मिरा रोड येथे भरणारा आठवडी सोमवार बाजार व उड्डाण पुलाखाली भरणारा आठवडी शनिवार बाजार यामुळे रहदारीस व वाहतुकीस अडचण व होणाऱ्या चोऱ्या, वाढणारे प्रदूषण यामुळे या बाजारा विषयी नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. तेव्हा ते दोन्ही बाजार तातडीने बंद करावेत.

भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड ते चेणा विभागाकरीता लिलाव पद्धतीने बाजार फी वसुली मक्ता देण्यांत आला आहे. मक्ता घेताना ज्या अटी-शर्ती ठरविण्यांत आल्या आहेत त्या अटी-शर्तीनुसार भागात फेरीवाल्यांना बसण्यांस परवानगी देण्यांत आली आहे. त्या व्यतीरीक्त अन्य सर्व ना-फेरीवाला क्षे सार्वजनिक रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कराराचा भंग केल म्हणून दंडात्मक कायदेशीर कारवाई करावी.

महानगरपालिका क्षेत्रात ज्या ठीकाणी फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यांत आले आहे. त्या क्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांच्या निर्णयाच्या अधिन राहून फेरीवाला क्षेत्रासाठी प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- श्री. लक्ष्मण गणपत जंगम    अनुमोदक :- श्री. राजेश शंकर वेतोस्कर

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे**

**भाईंदर (प.) विभाग**

**फेरिवाला क्षेत्र**

(१) बाबासाहेब आंबेडकर मार्ग, महावीर अपार्टमेन्ट ते (सालासर) विनायक पॅलेस बिल्डींग पर्यंतचा रस्ता

(२) रेल्वे फाटक समोरील रस्त्यावर कमला पार्क व वॉलचंद कॉम्प्लेक्स पर्यंत.

(३) या शिवाय सर्व भाग ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावेत.

**ना फेरिवाला क्षेत्र**

(१) भाईंदर (प.) विनायक पॅलेस जैन मंदिरच्या बाजूने देवचंदनगरकडे जाण्याच्या दोन्ही गल्ल्या.

(२) चर्च ते महानगरपालिका (जुने) हे दोन्ही ना फेरीवाला क्षेत्रामध्ये समाविष्ट करावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. वंदना चक्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

प्रभाग क्र. ७१ विजयपार्क ते शिवपुजा बिल्डींग व पंजाब नॅशनल बँक या रस्त्यांवर फेरीवाला क्षेत्र नमुद करावे ही विनंती

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

दहिसर चेक नाक्यावरुन पेणकरपाड्याकडे जाणारा रस्ता (सागर हॉटेल ते बॉम्बे बॉटल कंपनी पर्यंतचा रस्ता फेरीवाला झोन करण्यात यावा.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रामध्ये गावदेवी मंदिर मार्ग (जरीमरी तलाव रोड, काशिमिरा) नमुद करण्यात यावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

नर्मदा कुंज (रावलनगर) ते सुलभ शौचालय येथे बसवू नये.

**सदर ठरात सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रात नमुद नसलेल्या रस्त्याच्या एकतर्फी फेरीवाले बसवावे. राममंदिर भाईंदर (प.) येथे फेरीवाले हटवून नाझरेथ चर्चच्या बाजूने मोतीनगर येथे जाणारा रस्ता फेरीवाले बसवणे फेरीवाला क्षेत्रात बसणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येवू नये. तसेच शिवार गार्डन पासून पुढे सरदार वल्लभभाय शाळेकडे जाणाऱ्या शिवार गार्डनच्या लागून असलेल्या बाजूस फेरीवाले बसवणे. तसेच १ महिन्या अगोदर बाजार लिलावाचा ठेका दिला आहे. त्यात या जागा, रस्ता यांचा समाविष्ट करावा अशी सुचना मी मांडत आहे. ती मंजुर करुन घ्यावी. संबंधीत प्रकरणे मा. महासभा, स्थायी समिती सभाचे ठराव व्यपगत करावे मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निबंधाचे पाळण करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मा.
भाईदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/५२/2022-23

दि.१९/०८/ 2022

## // कार्यादेश //

प्रति,

मे. श्री. गजानन इंटरप्रायजेस,

ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,

फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा रोड ते चेणा विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.

2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.

3. दि. 11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा रोड ते चेणा विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मिरा रोड ते चेणा | 25/08/2022 ते 24-08-2023 | 2,56,63,820/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. /08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु. 38,49,573/- (अक्षरी अडतीस लाख एकोणपन्नास हजार पाचशे त्र्याहत्तर) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे दहा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेरं लिलाव केल्यांनंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन (प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करुन दि. 25/08/2022 पासुन लिलावाच्या कारारनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

२५.८.२२

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/५३ /2022-23 दि.११/०८/2022

// कार्यादेश //

प्रति,

मे. श्री. गजानन इंटरप्रायजेस,

ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,

फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.

2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.

3. दि.11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (पश्चिम) | 25/08/2022 ते 24-08-2023 | 2,31,72,198/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. 08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु. **34,75,830/-** (अक्षरी चौतीस लाख पंच्यातर हजार आठशे तीस मात्र) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे दहा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेर लिलाव केल्यांनतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन ( प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल ) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करून दि.25/08/2022 पासुन लिलावाच्या काररनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मा
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/५५/2022-23

दि.११/८/2022

## // कार्यादेश //

प्रति,

मे. श्री. गजानन इंटरप्रायजेस,

ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,

फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा ते उत्तन विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.
2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.
3. दि.11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा ते उत्तन विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मुर्धा ते उत्तन | 25/08/2022 ते 24-08-2023 | 16,15,953/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. /08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु. 2,42,393/- (अक्षरी दोन लाख बेचाळीस हजार तीनशे त्र्यान्नव मात्र) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे द.रा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेर लिलाव केल्यांनंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन (प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करुन दि.25/08/2022 पासुन लिलावाच्या काररनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मा
भाईदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/ ५१/2022-23

दि.११/०८/2022

## // कार्यादेश //

प्रति,

मे. श्री. गजानन ्टरप्रायजेस,

ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,

फाटक रोड, भाईदर (प.)

विषय :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भाईदर (पूर्व) विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.
2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.
3. दि.11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भाईदर (पूर्व) विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | भाईदर (पूर्व) | 25/08/2022 ते 24-08-2023 | 2,44,18,512/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. /08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु.36,62,777/- (अक्षरी छत्तीस लाख बासष्ठ हजार सातशे सत्यात्तर मात्र) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे दहा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेर लिलाव केल्यांनंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन (प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल ) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करुन दि. 25-08-2022 पासुन लिलावाच्या कारारनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

## RTI REQUEST DETAILS

| | | | |
|---|---|---|---|
| **Registration No. :** | MBMCO/R/2023/60184 | **Date of Receipt :** | 16/04/2023 |
| **Type of Receipt :** | Online Receipt | **Language of Request :** | English |
| **Name :** | Ravindra Raghuwanshi | **Gender :** | Male |
| **Address :** | Sector-2, B-5/14, , Mira Road, Pin:401107 | | |
| **State :** | Maharashtra | **Country :** | India |
| **Phone No. :** | +91-9930020016 | **Mobile No. :** | +91-9930020016 |
| **Email :** | ravi.raghuwanshi@gmail.com | | |
| **Status(Rural/Urban) :** | Urban | **Education Status :** | Graduate |
| **Is Requester Below Poverty Line ? :** | No | **Citizenship Status** | Indian |
| **Amount Paid :** | 10 | **Mode of Payment** | Payment Gateway |
| **Mode(s) of information Supply :** | Hard Copy | | |
| **Does it concern the life or Liberty of a Person ? :** | Details not provided. | **Request Pertains to :** | Sanjay Donde Market |
| **Information Sought :** | १.अधिकृत व अनधिकृत फेरीवाल्यांकडून शुल्क वसूल करण्यासाठी बाजार विभागा तर्फे मागविण्यात येणाऱ्या निविदेच्या अटी व शर्तींची प्रत. २.अधिकृत व अनधिकृत फेरीवाल्यां कडून बाजार विभाकडून भाडे वसुली करण्या साठी कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कार्य आदेशाची (वर्क ऑर्डरची) प्रत. ३.मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील फेरीवाले व नाफेरीवाले क्षेत्राची यादी. ४.सध्या अस्तित्वात असलेले मान्यताप्राप्त फेरीवाले क्षेत्रला ज्या महासभेमध्ये मंजुरी देण्यात आली, त्या ठरावाची प्रत आणि त्याचा गोषवारा. ५.मीरा भाईंदरच्या हद्दीत फेरीवाल्यांचे शेवटचे सर्वेक्षण कधी आणि कुठल्या वर्ष करण्यात आले होते. या सर्वेक्षणादरम्यान आढळलेल्या अधिकृत व अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या. ६.अधिकृत फेरीवाल्यांची संख्या आणि या अधिकृत फेरीवाल्यांकडून वसूल केलेल्या शुल्काची रक्कम. ७.अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या आणि या अनधिकृत फेरीवाल्यांकडून वसूल करण्यात आलेल्या शुल्काची रक्कम. ८.फेरीवाले क्षेत्रे ज्या आधारावर ठरविण्यात येत आहेत त्याची प्रत व या बाबत सरकारची काही मार्गदर्शक तत्त्वे असतील तर त्याची प्रत. | | |

आवक क्र. ०६ (मा.अ.)
दि. १५.६.२३

Print Close

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/ बाजार/17 /2023-24 दि.16/6/2023

प्रति,
**श्री. रविंद्र रघुवंशी,**
सेक्टर नं. 2, बी-5/114,
मिरारोड (पुर्व) - 401107.

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.**

**संदर्भ :- आपला दि. 16-04-2023 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

उपरोक्त विषयान्वये या विभागाकडे माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला संदर्भिय अर्ज प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1. | अधिकृत व अनधिकृत फेरीवाल्यांकडून शुल्क वसूल करण्यासाठी बाजार विभागा तर्फे मागविण्यात येणाऱ्या निविदेच्या अटी व शर्तीची प्रत. | निविदेच्या अटी व शर्तीची प्रत सोबत जोडली आहे. |
| 2. | अधिकृत व अनधिकृत फेरीवाल्यांकडून बाजार विभाकडून भाडे वसुली करण्या साठी कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कार्य आदेशाची (वर्क ऑर्डरची) प्रत. | ठेकेदारास देण्यात आलेल्या चार ही विभागांची कार्यादेशाची प्रत सोबत जोडली आहे. |
| 3. | मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील फेरीवाले व ना फेरीवाले क्षेत्राची यादी. | मनपा हद्दतील फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्रांची यादी जोडली आहे. |
| 4. | सध्या अस्तित्वात असलेले मान्यताप्राप्त फेरीवाले क्षेत्राला ज्या महासभेमध्ये मंजुरी देण्यात आली, त्या ठरावाची प्रत आणि त्याचा गोषवारा. | वरील प्रमाणे |
| 5. | मीरा भाईंदरच्या हद्दीत फेरीवाल्यांचे शेवटचे सर्वेक्षण कधी आणि कुठल्या वर्ष करण्यात आले होते. या सर्वेक्षणादरम्यान आढळलेल्या अधिकृत व अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या. | सर्वेक्षण बाबतचा विषय हा समाज विकास विभागांशी संबंधित असुन सदरची माहिती या बाजार विभागास उपलब्ध नाही. |
| 6. | अधिकृत फेरीवाल्यांची संख्या आणि या अधिकृत फेरीवाल्यांकडून वसूल केलेल्या शुल्काची रक्कम. | महानगरपालिकेने बाजार फी वसुली करण्यासाठी ठेकेदारास वार्षिक पध्दतीने ठेका देण्यात आलेला आहे. सदर ठेकेदार मासिक हप्ता नियमित मनपा फंडात जमा करीत आहे. |
| 7. | अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या आणि या अनधिकृत फेरीवाल्यांकडून वसूल करण्यात आलेल्या शुल्काची रक्कम. | माहिती उपलब्ध नाही. |

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ BP 278443

## // करारनामा //

आज दि.11.08.2022 रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका येथे पुढील पक्षामध्ये भाईंदर (पूर्व/पश्चिम) विभागातील बाजार फी/लायसन्स फी ठेकेदाराद्वारे वसुल करणेकरिता करारनामा करण्यांत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यामार्फत श्री.अजित मुठे, उप-आयुक्त कार्यालयाचा पत्ता, स्व.इंदीरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ४०११०१ येथे असुन या पुढील लेखामध्ये याचा उल्लेख "प्रथम पक्षीय" असा केला आहे. यामध्ये हक्कदार इ. चा समावेश होतो.

आणि

मे.श्री.गजानन इंटरप्रायजेस, कार्यालयाचा पत्ता ए/101,श्री गजानन प्रसन्न, फाटक रोड, भाईंदर (पश्चिम), ठाणे - ४०११०१ येथे असुन या पुढील लेखामध्ये याचा उल्लेख "द्वितीय पक्षीय" असा केला आहे. यामध्ये त्यांचे हक्कदार, वारस इ. चा समावेश होतो.

ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील भाईंदर (पूर्व), क्षेत्रातील रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्याकडून बाजार फी वसुल करण्याची व सदरचे काम कोणत्याही अभिकरणाकरवी ती पार पाडण्याची तरतुद आहे.

त्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व),या विभागातील फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुली करीता अभिकर्ता नेमणूकीबाबत दि. **21.03.2022** रोजीचे दैनिक, जनखुलासा, प्रहार, व दिनांक **22.03.2022** रोजी दिलेल्या द ग्लोबल टाईम्स या वृत्तपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यांत आली. सदर जाहिर नोटीसीनुसार दि. **06.04.2022** रोजी ई-ऑक्शन लिलाव पध्दतीने भाईंदर (पूर्व), या विभागातील फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुलीकरीता लिलाव करण्यात आला.

ज्याअर्थी सदर लिलावामध्ये " द्वितीय पक्षीय" यांना रु. 2,44,18,512/- (अक्षरी रुपये दोन कोटी, चौवेचाळीस लाख, अठरा हजार, पाचशे बारा मात्र) ही लिलावाची अंतिम बाजार वसुली रक्कम मंजुर झालेली आहे. प्रथम पक्षीय यांनी " द्वितीय पक्षीय" यांना भाईंदर (पूर्व), या विभागातील फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुलीचा ठेका उक्त रक्कमेसाठी देण्याचे मान्य करुन दि. 08 / 08 / 2022 रोजी स्विकृत पत्र देण्यात आले आहे.

ज्याअर्थी प्रथम पक्षीय यांनी दिलेल्या प्रस्तावाचा आणि कामाच्या तपशिलाचा विचार करून " द्वितीय पक्षीय" यांनी बाजार वसुलीच्या कामाकरिता दिलेल्या संमतीनुसार " द्वितीय पक्षीय" यांना खालील अटीशर्तीस अधिन राहून भाईंदर (पुर्व), विभागातील फेरीवाला क्षेत्रातील रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्याकडुन बाजार फी वसुली करणेसाठी मे श्री.गजानन इंटरप्रायजेस यांना दि. 25 / 08 / 2022 ते दि 24 / 08 / 2023 या (१२ महिन्यांसाठी) कालावधीकरीता अभिकर्ता म्हणून नेमण्यासाठी ठरविले आहे. आणि त्यास अनुसरुन खालील अटीशर्तीनुसार करारनामा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीय यांना बंधनकारक आहेत.

# या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत

1 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा महासभेने ठराव क. १९/०४/२००८ रोजी मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्र घोषित केले आहेत. सदर भाईंदर (पूर्व), विभागासाठी मंजूर करण्यात आलेल्या फेरीवाला व ना–फेरीवाला क्षेत्राची यादी या कारनाम्यासोबत जोडून Annexure A & B संबोधण्यात येत आहे.

2 द्वितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांच्याकडून त्यांची निविदा विकाराचे पत्र मिळाल्यापासून पाच दिवसात निश्चित १ वर्षाच्या अंतिम बाजार खिलाय रक्कमेच्या १५ टक्के (२,४४,१८,५१२ X १५ %) रु.३६,६२,७७७/-(अक्षरी छत्तीस लाख बासष्ट हजार सातशे सत्याहत्तर रु. मात्र) इतकी सुरक्षा अनामत रक्कम म्हणून प्रथम पक्षीय यांच्याकडे जमा करावी.

3 प्रथम पक्षीय यांना सदर ठेका चालू असताना भाईंदर (पूर्व), विभागातील फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्राच्या यादीत बदल करण्याचा संपूर्ण अधिकार आहे. याबाबत द्वितीय पक्षीय यांना प्रथम पक्षीय यांच्या विरुध्द कोणताही दावा सांगता येणार नाही.

4 बाजार फी वसुलीचे काम ज्यांचे नावाने मंजूर होईल, त्यांनाच बाजार फी वसूलीचे काम करणे बंधनकारक आहे. दुसरे कोणास उप-कंपाट देता येणार नाही किंवा सदरचा ठेका हस्तांतरीत करता येणार नाही.

5 मा. महासभा दि.१९/०७/२००८ ठराव क्र.२९ अन्वये घोषित केलेल्या "ना-फेरीवाला क्षेत्र" मध्ये "बाजार फी" ची वसुली द्वितीय पक्षीय यांना करता येणार नाही. महानगरपालिकेने ठरविलेल्या ना फेरीवाल क्षेत्रांत "बाजार फी वसुली करू नये, पसुली केल्याचे प्रथम पक्षीय यांच्या निदर्शनास आढळून आल्यास द्वितीय पक्षी r यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल. परंतु मा. स्थायी समिती सभा दि. १४/१०/२०१५ ठराव क्र.८८ अन्वये ना फेरीवाला क्षेत्रात/सार्वजनिक रस्त्यांवर दिया बसल्यास त्यांचेवर महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकारी यांच्या नियंत्रणात फेरीवाला पथकाकडून हटविण्याची कारवाई सतत करण्यात येणार आहे. कारवाई होत असतानाही फेरीवाले ना फेरीवाले क्षेत्रात बसल्यास बाजार फी आकारण्यात यावी.

6 "बाजार फी वसुली करता वापरण्यात येणारी पावती पुस्तके प्रत्येक विभागासाठी वेगवेगळी प्रथम पक्षीय यांच्याकडून पुरविण्यात येतील. प्रत्येक पावतीवर महानगरपालिकेचा शिक्का, दररोजची तारीख व अनुक्रमांक असल्याशिवाय द्वितीय पक्षीय यांना "बाजार की" वसूल करता येणार नाही. तसेच प्रथम पक्षीय पांस "बाजार की" वसुलीच्या पावत्या तपासण्याचा अधिकार राहील, "बाजार फी वसुलीचा ठेका संपल्यानंतर द्वितीय पक्षीय यांनी शिल्लक राहिलेले पावती पुस्तक प्रथम पक्षीय यांना परत करावयाचे आहे.

7 प्रथम पक्षीय च्या मा. स्थायी समिती सभा उराव क्र.. दि. १४/१०/२०१५ अन्यये फेरीवाल्याकडून बाजार की निश्चित केलेल्या दर प्रती चौरस मिटर रु.२५/- प्रमाणे घ्यावयाची असून एक चौ.मि.पेक्षा अधिक जागा फेरीवाला व्यापत असेल तर त्यासाठी रु.५०/- "बाजार फी" वसुल करावी व दोन चौ.मिटर पेक्षा अधिक जागा व्यापती असल्यास रु.७५/- या दरानुसार पुढे फेरीवाल्यांकडून "बाजार फी वसुली करणे द्वितीय पक्षीय यांस बंधनकारक आहे. प्रथम पक्षीय यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त "बाजार फी" वसूल करणे द्वितीय पक्षीय यांना वसुली करता येणार नाही प्रथम पक्षीय बाजाराचे ठिकाणी फलकावर व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर "बाजार फी चे दर प्रसिध्द करेल. "बाजार फी मंजूर दरानुसारच ठेकेदारास वसुली करावी लागेल. त्यात द्वितीय पक्षीय यांना यांस बदल करता येणार नाही.

| | |
|---|---|
| 8 | प्रथम पक्षीय यांनी ठरवून दिलेल्या मंजूर दरापेक्षा जास्त दराने द्वितीय पक्षीय हे "बाजार फी" वसुल करीत असल्याबाबतची तक्रार प्रथम पक्षीय यांच्याकडे प्राप्त झाली "बाजार फी" वसुली बाबत सतत तीन वेळा तक्रार आल्यास वस्तुस्थितीची पाहणी करून प्रती तकारी मागे रु.१,०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येऊन द्वितीय पक्षीय यांच्याकडून वसूल केली जाईल. |
| 9 | द्वितीय पक्षीय यांना तक्रारीच्या अनुषंगाने दंड आकारून देखील उल्लंघन केल्यास, द्वितीय पक्षीय महानगरपालिकेत जमा १५ अनामत रक्त केली जाईल, तसेच प्रसंगी ठेका रद्द करण्याची कार्यवाही केली जाईल व बाजार महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्यास द्वितीय पक्षीय यांस जवाबदार धरून त्याची भरपाई Risk Cost Clause नुसार द्वितीय पक्षीय यांच्या कडून केली जाईल |
| 10 | बाजारात बसणा–या फेरीवाल्याकडून दिवसाला एका वेळेस "बाजार फी वसुली करावी लागेल. सदर विक्रेत्याकडून दिवसांतून दोन वेळा "बाजार फी " वसुली करता येणार नाही. परंतु फेरीवाल्याने जागा बदल्यास अशा फेरीवाल्याकडून नव्याने "बाजार फी" दयावी लागेल. |
| 11 | ना फेरीवाला क्षेत्रामधील/सार्वजनिक रस्त्यावरील विक्रेते/फेरीवाले हटविण्याचा अधिकार महानगरपालिकेला राहील. |
| 12 | द्वितीय पक्षीय यांनी फेरीवाल्यांकडून "बाजार फी" ची वसूली नियमानुसार, सौजन्याने व संसदीय मार्गाने करावी. फेरीवाले कुठल्याही युनियनचे असले वा त्यांच्याकडे युनियनचे कार्ड उपलब्ध असले तरी देखील महानगरपालिकेची दैनंदिन पावती देणे अनिवार्य आहे. तसेच द्वितीय पक्षीय यांनी बाजार फी हि दमदाटीने वसुली केल्यास ठेकेदारावर नियमानुसार कारवाई केली जाईल |
| 13 | द्वितीय पक्षीय यांनी आदिवासी वर्गाकडून "बाजार फी वसुली करू नये, |
| 14 | द्वितीय पक्षीय यांनी प्रत्येक7 महिन्याच्या तारखेपर्यंत निश्चित केलेल्या हफ्त्याची रक्कम Demand Draft /RTGS /Cash स्वरूपात भरणा करावयाचा आहे. सदर रक्कमेचा विहीत मुदतीत भरणा न केल्यास सदर रक्कमेचा भरणा करेपर्यंत १८% द.सा.द.शे दराने व्याज आकारण्यात येईल. द्वितीय पक्षीय यांनी त्यांच्या विरुध्द आकारलेल्या व्याज किंवा दंड रक्कमेचा भरणा प्रथम पक्षीय यांच्याकडे मुदतीत न केल्यास, द्वितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांच्याकडे जमा केलेल्या अनामत रक्कमेतून सदर दंडाची व व्याजाची रक्कम वसूल करण्यांत येईल. |
| 15 | महानगरपालिकेच्या मालकीच्या वास्तुमध्ये बसणाऱ्या अधिकृत भाडेकरू जवळ महानगरपालिकेची भाडे पावती आहे अश्या मासळी /मटण/ फळ/भाजी विक्रेत्याकडून "बाजार फी" द्वितीय पक्षीय यांना वसूल करता येणार नाही. |
| 16 | द्वितीय पक्षीय यांनी निश्चित केलेल्या हप्त्यांची रक्कम भरणेस आणि/किंवा हप्ता भरणेस विलंब केल्यामुळे त्यावर आकारण्यात येणारे व्याज भरणेस सतत दोन महिने कसुर केल्यास आणि/किंवा करारनाम्यातील अटीशर्तींचे उत्लंघन केल्यास महानगरपालिकेत जमा केलेली बाजाराची अनामत रक्कम जप्त करून ठेका रद्द करण्याची कारवाई केली जाईल. |
| 17 | द्वितीय पक्षीय लिलावाची मंजूर रक्कम रु.**2,44,18,512/-** इतकी असून कार्यादेश मिळाल्यानंतर प्रती महिना निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हस्त्याचे दहा आगाऊ धनादेश त्या प्रत्येक माहिन्याची १ ते ७ दरम्यानची तारीख टाकून प्रथम पक्षीय यांना देण्यांत यावेत. द्वितीय पक्षीय यांनी संबंधित महिन्यातील हत्त्याची रक्कम सदर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत म्हणजेच मुदतीत प्रथम पक्षीयकडे भरणा न केल्यास सदर महिन्यासाठी प्रथम पक्षीय यांच्याकडे आगाऊ जमा केलेला धनादेश प्रथम पक्षीय यांच्या खात्यात जमा करण्यांत येईल |
| 18 | बाजार बोली लिलावाच्या मंजूर रक्कमेवर वेळोवेळी निर्धारीत केलेल्या दराने राज्य व कैंद्रीय कर भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील. (कर भरणा पावतीची नक्कल प्रत या कार्यालयात सादर करावी.) |

| | |
|---|---|
| 19 | द्वितीय पक्षीय यांनी हप्त्याची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेस पुर्ण अधिकार राहील. तदनंतर फेर लिलाव केल्यानंतर /निविदा मागविल्यानंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई Risk & Cost Clause नुसार द्वितीय पक्षीय यांच्या जमा करण्यांत आलेल्या अनामत रक्कमेतून किंवा त्यांचे कडून वसुल कॅली जाईल. |
| 20 | द्वितीय पक्षीय यांचेवतीने बाजार फी बाबतचे महानगरपालिकेचे मान्यता प्राप्त ठेकेदाराचे ओळखपत्र असणे बंधनकारक राहील ओळखपत्राशिवाय वसुली केली गेल्यास कारवाई केली जाईल. |
| 21 | लिलाव मंजूर झालेनंतर द्वितीय पक्षीय यांनी मुदतीपूर्वी ठेका मागे घेतल्यास निविदे सोबत भरलेली इसारा रक्कम / सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिका जप्त करील व द्वितीय पक्षीय यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यांत येईल. |
| 22 | सदरचा ठेका यशस्वीरित्या पूर्ण झाल्यास किंवा कैंद्र शासनाने लागु केलेल्या पथविकेता अधिनियम नुसार कार्यवाही चालु केल्यामुळे सदरचा करारनामा रद्द केला पासुन म्हणजेच प्रथम पक्षीय याना कोणतीही रक्कम येणे शिल्लक नसल्यास किंवा महानगरपालिका विरुद्ध कोणताही दावा नसल्यास सदर सुरक्षा अनामत रक्कम िद्वितीय पक्षीय यांना बिनव्याजी परत करण्यांत येईल. |
| 23 | कैंद्र शासनाने पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ लागू केला आहे. अधिनियमाच्या कलम ३६ व ३८ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियम नियम २०१६ व नियम २०१७ तयार केली आहे. नियम २०१६ मधील तरतुदीनुसार मनपाच्या स्तरावर नगर पथविक्रेता समिती गठीत करणेची कार्यवाही सुरु आहे. सदरची कार्यवाही होणेकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीच्या अधिन राहून द्वितीय पक्षीय यांना ठेका देण्यात येत आहे. सदर समिती स्थापनेबाबत पथ विक्रेताचे सर्वेक्षण करुन नोंदणी करणेबाबत व त्यांना त्यानुसार प्रमाणपत्राबाबत महाराष्ट्र शासनाने किंवा कोणत्याही न्यायालयाने आदेश दिल्यास सदरचा ठेका रद्द समजण्यात येईल, याबाबतची द्वितीय पक्षीय यांना प्रथम पक्षीय यांच्याकडे तक्रार करता किंवा दावा सांगता येणार नाही. |
| 24 | सदर करारनाम्यातील अटी-शर्तीमध्ये बदल करण्यांचा अधिकार प्रथम पक्षीय यांना राहील. |
| 25 | सदर ठेक्यासंदर्भात हद मा. न्यायालय, ठाणे हयांची असेल. |
| 26 | नैसर्गिक आपत्ती अथवा कुठल्याही कारणास्तव बाजार बंद करावयास लागल्यास बाजार फी वसुलीस झालेल्या नुकसानीची भरपाई देणे बाबत अंतिम निर्णय मा. आयुक्त साहेब यांचा राहील |
| 27 | या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षती / हानी झाल्यास द्वितीय पक्ष क्षतिपूर्तीची हमी देत आहे. |
| 28 | द्वितीय पक्षीय यांनी त्यांना दिलेले काम मध्येच खंडीत केले किंवा करारनाम्यातील अटीशती चा भंग केल्यास द्वितीय पक्षीय यांच्या सोबत केलेला करारनामा रद करून द्वितीय पक्षीय यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांस राहील. |
| 29 | करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील. |
| 30 | महाराष्ट्र मुद्रांक शुल्क कायदा अन्वये सदर करारनाम्यासाठी योग्य ते मुद्रांक शुल्क (Stamp Duty) भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील. |
| 31 | सदर ठेक्याच्या संपूर्ण प्रक्रियेत ठेक्यासंदर्भात सादर करण्यांत आलेली सर्व कागदपत्रे दस्तऐवज निविदा फॉर्म ही करारनाम्याचा एक भाग समजण्यांत येईल. |

| | |
|---|---|
| | सदर ठेक्याच्या संपूर्ण प्रक्रियेत ठेक्यासंदर्भात सादर करण्यांत आलेली सर्व कागदपत्रे दस्तऐवज निविदा फॉर्म ही करारनाम्याचा एक भाग समजण्यांत येईल. |
| 2 | मासिक ठेकेदार यांना वस्तु व सेवा कराचा भरणा करणे बंधनकारक आहे. ठेकेदार यांनी करारनामा केल्यानंतर वस्तु व सेवा कर व इतर शासकीय कराचा भरणा करण्यास कसूर केल्यास सदरची रक्कम अनामत रक्कमेमधुन वसुल करणेत येईल. |
| 3 | मनपामार्फत बांधा वापरा हस्तांतरीत करा (BOT तत्वावर) काही ठिकाणी मार्केट विकसित करण्यात आलेले आहे. तसेच काही ठिकाणी मार्केट बांधण्याची प्रक्रीया सुरु आहे. तरी सदर BOT तत्वावरील मार्केट मध्ये रस्त्यावरील व्यवसाय करणारे लाभार्थी यांचा समावेश होणारी संख्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाच्या अनुषंगाने विचारात घेऊन विषयांकित कामाकरिता नेमण्यात येणाऱ्या ठेकेदाराची भरावयाच्या बाजार फी हप्त्यात त्यानुसार सवलत देण्यात येईल, त्यामुळे यशस्वी ठेकेदार यांना BOT तत्वावरिल मार्केट मध्ये बसणाऱ्या फेरीवाल्याकडुन बाजार फी वसुल करता येणार नाही, ज्या दिनांकास जेवढे फेरीवाले मार्केटमध्ये स्थलांतर होतील, तेवढी रक्कम वार्षिक अंतिम मंजूर देयक रक्कमेतून कमी करण्यात येईल. तसेच त्या लाभार्थिकडून बाजार फी वसूल करता येणार नाही. |
| 34 | आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुली बाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील |
| 35 | ठेकेदार यांनी हप्त्यांची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास किंवा बाजार फी वसुली चे काम करणेस थांबविल्यास व्दितीय लिलाव करण्याचा महानगरपालिकेला पूर्ण अधिकार राहील. व्दितीय लिलाव केल्या नंतर कमी दराने करारनामा करावा लागल्यास व महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई या प्रथम लिलाव घेणा-या ठेकदाराकडुन वसुली केली जाईल. त्याकरिता प्रथम ठेकेदार / अभिकर्ता यांस महापालिकेविरुध्द दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. |
| 36 | बाजारात बसणा-या विक्रेत्याकडून महानगरपालिका नियमानुसार बाजार फी वसुल करावी लागेल. दमदाटीने/वाजवी बाजार फी पेक्षा जास्त/बाजार पावती न देता बाजार फी वसुली केल्यास ठेकेदारावर नियमानुसार कडक कारवाई केली जाईल. |
| 37 | महानगरपालिका हददीत कोणत्याही ठिकाणी बाजार भरला तरी महानगरपालिका ठरवुन देईल त्या कंत्राटदाराशिवाय इतर कोणासही बाजार फी वसुली करण्याचा अधिकार नाही. |
| 38 | सध्या व पुढे ज्या प्रमाणात जागा राहील व महानगरपालिका दाखविल त्याच जागेवरुन बाजार फी वसुल करावी लागेल. त्यामध्ये महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. |
| 39 | बाजार फी ची वसुली सौजन्याने व सहनशिलतेने करावी लागेल. |
| 40 | महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केटमध्ये बसणा-या मासळी /मटण/फळ/भाजी विक्रेत्याकडुन बाजार फी वसुल करता येणार नाही. |
| 41 | ठेकेदारामार्फत बाजार फी वसुली करणा-या कर्मचा-याकडे बाजार फी वसुली बाबतचे ओळखपत्रा शिवाय वसुली केली गेल्यास ठेकेदाराविरुध्द महापालिकेमार्फत कारवाई केली जाईल. |
| 42 | महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी हयांना बाजार फी वसुलीच्या पावत्या तपासण्याचा अधिकार राहिल. |

| | |
|---|---|
| | पथ विक्रेता संरक्षण कायदा 2014 च्या तरतुदीच्या अधिन राहून ही निविदा मागविण्यात येत आहे. या कायदयाअंतर्गत पारीत होणारे /झालेले आदेश निर्णय ठेकेदारावर बंधनकारक राहतील |
| | उपरोक्त अटी शर्तीमध्ये कोणत्याही वेळी, कोणतीही अट समाविष्ठ करणे अथवा अंशतः किंवा पुर्णतः काढुन टाकणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांचेकडे राहतील. |

वरील सर्व अटीशर्ती उभय पक्षीय यांनी वाचून मान्य केल्या असून त्याप्रमाणे उभयपणे सहया यांत येत आहे.

नांकः / /

ळः भाईंदर (प.)

करारनामा लिहून घेणार

(श्री.अजित मुठे)

उप-आयुक्त

मिरा भाईंदर महानरपालिका

(प्रथम पक्षीय)

EE GAJANAN ENTERPRISES

Proprietor

रनामा लिहून देणार

ी. गजानन इंटरप्रायजेस्

र (पश्चिम)

ीदारः

सन २०२२-२३ / करारनामा रजिस्टर

अनु. क्रं. ५९२ दि.२३/८/२२ अन्वये

नोंद करणेत आली.

महापालिका सचिव

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२००८

प्रकरण क्र. २७ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करणे आणि नॉ-फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाल्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये काढून टाकणे.

ठराव क्र.२९.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये विना परवानगी चालू असलेल्या फेरीवाल्यांना व सार्वजनिक ठिकाणी विक्री करणाऱ्या व्यक्तींना नोटीस न देता काढुन टाकण्याची तरतुद आहे. अशाप्रकारे महानगरपालिका हद्दीत कार्यवाही करणेपूर्वी फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र ठरविणे आवश्यक आहे. तसेच शहरातील जनतेच्या अडचणीचा व रहदारीचा विचार करता शहरातील काही भाग हा फेरीवाला मुक्त करणे आवश्यक आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्राचे धोरण ठरवितांना यापूर्वी याबाबत वेळोवेळी झालेल्या मा. स्थायी समिती व मा. महासभेच्या निर्णयाचा तसेच या विषयी स्थापन करण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या समितीच्या अहवालाचा विचार करता विभाग निहाय खालीलप्रमाणे फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र करावे.

### १) भाईंदर (पश्चिम) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोदी पटेल नाका ते भाईंदर सेकंडरी स्कुल ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान) | डॉ. आंबेडकर रोड महावीर अपार्टमेंट ते [illegible] पॅलेस रस्त्यापर्यंत. |
| २ | पोलिस स्टेशन भाईंदर रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता. | राम मंदीर मार्ग पोलिस स्टेशन ते जैन मंदीर फुटपाथवर बैठकी विक्रेते |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुट रोड) बावन जिनालय जैन मंदिर ते धनी पॅलेस पर्यंतचा रस्ता. | शास्त्री नगर रस्त्याची डावी बाजू. रेल्वे समोर कमला पार्क व वालचंद कॉम्प्लेक्स |
| ४ | बावन जिनालय परिसर. | प्रकाश मार्केट ते जोशी निकेतन रस्त्याची बाजू, रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रेते बिल्डींगपर्यंत. |
| ५ | जे. एच. पोद्दार हायस्कूल रोड. | चर्च ते महानगरपालिका कार्यालय (जुना बाजार ते मोती नगर) |
| ६ | महाराजा अग्रसेन मार्ग. | भाईंदर (प.) येथे आठवडयाच्या बाजार वरील दिलेल्या रस्त्यांवर फेरीवाले बसवता परवानगी देण्यांत येत आहे. |
| ७ | जयप्रकाश नारायण मार्ग. | सदासत्य अपार्टमेंट ते अमृतवाणी रस्त्याच्या डाव्या बाजूस. |
| ८ | स्टेशन रोड ते बालाजी वसाहत ते रेल्वे पादचारी पुल, विनायक मंदीर मार्ग. | |
| ९ | भाईंदर स्टेशन ते पोलीस चौकी. | |
| १० | जनता नगरकडे जाणारा रस्ता. | |
| ११ | राममंदीर रोड | |
| १२ | मोदी पटेल रोड | |
| १३ | जैन मंदीरच्या बाजूने देवचंद नगरकडे जाणाऱ्या [illegible] | |

सत्य प्रत
नगर सचिव

| | | |
|---|---|---|
| १४ | ९० फुट रोड, रजिस्ट्रेशन ऑफिस समोरचा रस्ता | |

## २) भाईंदर (पूर्व) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका ते गोडदेव उद्यान सभोवताली (बी. पी. रोड) | भाजी मार्केट खारीगाव |
| २ | गोडदेव नाका ते नवघर नाका, गोडदेव तलाव परिसर, गोडदेव नाका ते अभिनव नाका नवघर फाटक रोड दोन्ही बाजू. | नवघर गावाजवळ इंदीरा नगरकडे (कुणाल कुटीर ते नवघर स्मशान रस्त्याची उजवी बाजू). |
| ३ | बंदरवाडी नाका ते कृणाल कुटीर नवघर रोड. (नवघर नाका) | नवघर गावाकडे जाणारा रस्ता. |
| ४ | बंदरवाडी नाका ते हॉटेल प्रशांत (रेल्वे समांतर रस्ता) | इंद्रवरुण हॉल ते रेल्वे समांतर खाडी पर्यंत |
| ५ | साई बाबा मंदीर ते गोडदेव नाका (गोडदेव फाटक रोड) | आर. एन. पी. पार्क चिंतामणी अपार्टमेंट. |
| ६ | बंदरवाडी नाका ते जेसल पार्क जैन मंदीर पर्यत. | परब मसाले ते साधुराम हॉटेल. |
| ७ | भाईंदर (पूर्व) फाटक चर्च ते केबीन रोड | नर्मदा कुंज (रावल नगर) ते सुलभ शौचालय उजवी बाजू. |
| ८ | पानटेकडी रोड (शिर्डी नगर रोड ते गोडदेव स्मशान भूमी रोड) | राम गोपाल बिल्डींग ते शितल अपार्ट. रस्त्याची उजवी बाजू. |
| ९ | केबिन रोड नाका ते नर्मदा नगर मधून एम. आय. उद्योग नगर पासून अभिनव स्कूल नाका पर्यंत जाणारा रस्ता. | हनुमान नगर एक बाजू. |
| १० | नवघर क्रॉस रोड. | |
| ११ | भाईंदर (पूर्व) विजय पंजाब ते खारीगांव सत्यनारायण मंदीर ते रामगोपाल सदन केबीन रोड पर्यत. | |
| १२ | इंद्रवरुण हॉल ते जैन मंदिराची एक बाजू. (जेसल पार्ककडे जाणारा एक रस्ता) | |
| १३ | खारी तलाव रोड | |
| १४ | बंदरवाडी नाका ते जैन मंदीर डीवाईन शेल्टर/ कपूर टॉवर पर्यंत. | |
| १५ | के. दत्तु म्हात्रे मार्ग (न्यु गोल्डन नेस्ट १०० फुटी रोड) | |
| १६ | दिपक हॉस्पीटल मार्ग. | |
| १७ | हनुमांन मंदिर ते एस.एन. कॉलेज. | |
| १८ | राहूल पार्क ते आर.एन.पी. पार्क. | |
| १९ | जागृती अपार्टमेंट ते रावल नगर ते नर्मदा कुंज. | |
| २० | नवघर क्रॉस रोड (एस.व्ही. रोड) | |
| २१ | नारायण मार्बल ते आयुक्तांच्या बंगल्या रस्ता | |
| २२ | धनेश हॉटेल ते तलाव रोड ते गांवदेवी मंदिर परिसर. | |
| २३ | साईबाब नगर किरण नाला (नवघर क्रॉस रोड) | |

## ३) मिरारोड विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.) फाटक ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या पर्यत. | नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग समोर फक्त<br>नरेंद्र पार्क इ-५ बिल्डींग ते मेघदुत बिल्डींग पर्यंत |
| २ | शांतीनगर संकुलनाचे प्रवेशव्दार ते एस.के. स्टोन पर्यतचा रस्ता. | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. २ व १० मधील बाजू. सेक्टर-२ च्या बाजूची. |
| ३ | मिरारोड स्टेशन पासून नयानगरकडे जाणारा रस्ता. | नया नगर रोहित बिल्डींग ते सिता पार्क गेट एक बाजू. |
| ४ | पोस्ट ऑफीस राजधानी अपार्ट. ते नाल्यापर्यतचा रस्ता. | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. ३ आणि ६ मधील एक बाजू. सेक्टर-३ च्या बाजूची. |
| | नेहतीया नगर / चंद्रेश निकेतन बिल्डींग लोढा ... शॉपींग सेंटर आणि उलफत | |

| | | |
|---|---|---|
| | मंझील पर्यंत. | |
| ६ | शांतीनगर सेक्टर ११ पाण्याची टाकी ते सृष्टीकडे जाणारा रस्ता. | पुजा नगर समोर [illegible] गल्ली एक बाजू. |
| ७ | मिरा रोड स्टेशन शांतीनगर गेट ते शितल नगर नाकापर्यंत | शांतीनगर सेक्टर-६ व फेस-३ मधील एक बाजू सेक्टर-६ च्या एक बाजू [illegible] |
| ८ | मिरारोड स्टेशन नयानगर रिक्षास्टँड ते शितल नगर नाकापर्यंत | नीदा पार्क ते [illegible] बिल्डींग पर्यंत एक बाजू. |
| ९ | पोस्ट ऑफीस मिरा रोड ते शांतीनगर सेक्टर क्र. १ ते ४ मधील दोन्ही बाजू | सेक्टर नं. ५ सी-३८ [illegible] ते बी-२६-२७ एक बाजु. |
| १० | शांती नगर सेक्टर क्र. ३ ते ६ मधून सृष्टीकडे जाणारा रस्ता दोन्ही बाजू. | |
| ११ | शितल नगर नाका ते जांगीड कॉम्प्लेक्स दोन्ही बाजू. ते सिल्वर पार्क सिग्नलपर्यंत दोन्ही बाजू. | |
| १२ | सेक्टर ... ६, बी-१ ते अे-७ पर्यंत एक बाजू. | |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. १ व २ मधील रस्ता | |
| १४ | शांतीनगर सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| १५ | मिरारोड पूर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स मधील अंतर्गत रस्ता | |
| १६ | गणपती मार्बल ते रामदेव पार्क पर्यंतचा रस्ता. | |
| १७ | शांतीनगर सेक्टर नं. ३ व ४ मधील रस्ता | |
| १८ | सृष्टी सेक्टर नं. ५ व ३ मधील रस्ता | |
| १९ | सृष्टी सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| २० | रॉयल गार्डन हॉटेल ते सिल्वर पार्क सिग्नल पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला. | |
| २१ | मिरारोड पूर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग शेवटच्या दुकानापासून ते अस्मिता व्हिनटेज पर्यंत दोन्ही बाजू. | |
| २२ | नयानगर हैदरी मस्जिद ते संघवी एम्पायर पर्यंत. | |
| २३ | मिरारोड पूर्व नयानगर मिरा नर्सिंग होम गल्ली झुबेदा बिल्डींग ते ऑचीड बिल्डींग पर्यंत दोन्ही बाजू. | |

४) काशीमिरा, मिरा गावठण व इतर हायवे लगत क्षेत्र

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | मिरा गावाच्या हायवे लगतचा रोड. | मिरागाव टॅक्स ऑफिस पासून ते पटेल प्लाझा इमारती पर्यंत. |
| २ | मिरा गावाकडे जाणारा रस्ता. | |
| ३ | नि. कमल ते लिबर्टी तबेल्यापर्यंत जाणारा रस्ता ते गांवदेवी मंदिर मार्ग. | |
| ४ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८. (दहिसर चेकनाका ते घर्सोवा नाका) | |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ते उड्डाण पुलापर्यंत मिरा भाईंदर मुख्य रस्ता व फाटक पर्यंत. | |

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ३० फुट व त्यापेक्षा रुंद असणारे सर्व रस्ते ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावा.

वरील प्रमाणे महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेत आले आहे. ना-फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसण्यास मनाई असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अन्वये ना-फेरीवाला क्षेत्रातील बसणाऱ्या फेरीवाल्यांना त्याठीकाणाहुन काढून टाकण्यांत यावे. अशा [illegible] करता त्यांच्यावर दंडात्मक कायदेशीर कारवाई

सत्य प्रत

...मिरा रोड ते घेणा विभागातील मिरा रोड येथे भरणारा आठवडी सोमवार बाजार व उड्डाण पुलाखाली भरणारा आठवडी शनिवार बाजार यामुळे रहदारीस व वाहतुकीस अडचण व होणारी चोऱ्या, वाढणारे प्रदुषण यामुळे या बाजारा विषयी नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. तेव्हा ते दोन्ही बाजार तात्काळ बंद करावेत.

भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड ते घेणा विभागाकरीता लिलाव पध्दतीने बाजार फी वसुली मक्ता देण्यांत आला आहे. मक्ता घेताना ज्या अटी-शर्ती ठरविण्यांत आल्या आहेत. त्या अटी-शर्तीप्रमाणे ... भागात फेरीवाल्यांना बसण्यांस परवानगी देण्यांत आली आहे. त्या व्यतीरीक्त अन्य सर्व ना फेरीवाला ... सार्वजनिक रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कराराचा भंग केला म्हणून दंडात्मक कायदेशीर कारवाई करावी.

महानगरपालिका क्षेत्रात ज्या ठीकाणी फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यांत आले आहे. त्या क्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांच्या निर्णयाच्या अधिन राहून फेरीवाला क्षेत्रासाठी प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- श्री. लक्ष्मण गणपत जंगम अनुमोदक :- श्री. राजेश शंकर वेतोस्कर

सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे

भाईंदर (प.) विभाग

फेरिवाला क्षेत्र

(१) बाबासाहेब आंबेडकर मार्ग, महावीर अपार्टमेन्ट ते (सालासर) विनायक पॅलेस बिल्डींग पर्यंतचा रस्ता

(२) रेल्वे फाटक समोरील रस्त्यावर कमला पार्क व वॉलचंद कॉम्प्लेक्स पर्यंत.

(३) या शिवाय सर्व भाग ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावेत.

ना फेरिवाला क्षेत्र

(१) भाईंदर (प.) विनायक पॅलेस जैन मंदिरच्या बाजूने देवचंदनगरकडे जाण्याच्या दोन्ही गल्ल्या.

(२) चर्च ते महानगरपालिका (जुने) हे दोन्ही ना फेरीवाला क्षेत्रामध्ये समाविष्ट करावे.

सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. वंदना चक्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

प्रभाग क्र. ७१ विजयपार्क ते शिवपुजा बिल्डींग व पंजाब नॅशनल बँक या रस्त्यांवर फेरीवाला क्षेत्र नमुद करावे ही विनंती

सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

दहिसर चेक नाक्यावरुन पेणकरपाड्याकडे जाणारा रस्ता (सागर हॉटेल ते बॉम्बे बॉटल कंपनी पर्यंतचा रस्ता फेरीवाला झोन करण्यात यावा.

सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रामध्ये गावदेवी मंदिर मार्ग (जरीमरी तलाव रोड, काशिमिरा) नमुद करण्यात यावे.

सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

नर्मदा कुंज (रावलनगर) ते सुलभ शौचालय येथे बसवू नये.

सदर ठरात सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रात नमुद नसलेल्या रस्त्याच्या एकतर्फी फेरीवाले बसवावे. राममंदिर भाईंदर (प.) येथे फेरीवाले हटवून नाझरेथ चर्चच्या बाजूने मोतीनगर येथे जाणारा रस्ता फेरीवाले बसवणे फेरीवाला क्षेत्रात बसणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येवू नये. तसेच शिवार गार्डन पासून पुढे सरदार वल्लभभाय शाळेकडे जाणाऱ्या शिवार गार्डनच्या लागून असलेल्या बाजूस फेरीवाले बसवणे. तसेच १ महिन्या अगोदर बाजार लिलावाचा ठेका दिला आहे. त्यात या जागा, रस्ता यांचा समाविष्ट करावा अशी सुचना मी मांडत आहे. ती मंजुर करुन घ्यावी. संबंधीत प्रकरणे मा. महासभा, स्थायी समिती सभाचे ठराव व्यपगत करावे मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निबंधाचे पाळण करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/५२/2022-23 दि.२१/०८/2022

## // कार्यादेश //

प्रति,

मे. श्री. गजानन इंटरप्रायजेस,

ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,

फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा रोड ते चेणा विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.
2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.
3. दि. 11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा रोड ते चेणा विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मिरा रोड ते चेणा | 25/08/2022 ते 24-08-2023 | 2,56,63,820/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. /08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु. 38,49,573/- (अक्षरी अडतीस लाख एकोणपन्नास हजार पाचशे त्र्याहत्तर) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे दहा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेरं लिलाव केल्यांनंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन (प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करुन दि. 25/08/2022 पासुन लिलावाच्या काररनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

२५.8.२२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/५३ /2022-23 | दि.११/०८/ 2022

## // कार्यादेश //

प्रति,
मे. श्री. गजानन इंटरप्रायजेस,
ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,
फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.
2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.
3. दि.11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (पश्चिम) | 25/08/2022 ते 24-08-2023 | 2,31,72,198/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. 08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु. 34,75,830/- (अक्षरी चौतीस लाख पंच्यातर हजार आठशे तीस मात्र) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे दहा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेर लिलाव केल्यांनंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन ( प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल ) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करुन दि.25/08/2022 पासुन लिलावाच्या काररनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**बाजार विभाग**

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/54 /2022-23

दि.११ / ८ / 2022

## // कार्यादेश //

प्रति,

मे. श्री. गजानन इंटरप्रायजेस,
ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,
फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा ते उत्तन विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.
2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.
3. दि.11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुर्धा ते उत्तन विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | मुर्धा ते उत्तन | 25/08/2022 ते 24-08-2023 | 16,15,953/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. /08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु. 2,42,393/- (**अक्षरी दोन लाख बेचाळीस हजार तीनशे त्र्यान्नव मात्र**) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे दहा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेर लिलाव केल्यांनंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन (प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करुन दि.25/08/2022 पासुन लिलावाच्या काररनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828


जा.क्र.मनपा/ बाजार/ ५१/2022-23 दि.११/०८/ 2022

## // कार्यादेश //

प्रति,

मे. श्री. गजानन एंटरप्रायजेस,

ए/101, श्री.गजानन प्रसन्न अपार्टमेंट,

फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) विभागातील बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत..

संदर्भ :- 1. मा. स्थायी समिती सभा दि. 02-08-2022 प्रकरण 94 ठराव क्र.79 अन्वये मंजुरी.
2. मा. आयुक्त सो. यांचे दि.14-06-2022 रोजीचे आदेश.
3. दि.11/08/2022 रोजीचा करारनामा

संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) विभागातील बाजार फी वसुली करीता आपणांस खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | कालावधी | मंजुर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (पूर्व) | 25/08/2022 ते 24-08-2023 | 2,44,18,512/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात यावी.

1. दि. /08/2022 रोजी मंजुर लिलाव रक्कमेनुसार रु.36,62,777/- (अक्षरी छत्तीस लाख बासष्ठ हजार सातशे सत्यात्तर मात्र) इतकी सुरखा अनामत रक्कम भरणा.
2. बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किंमतीचे दहा समान हफ्त्याचे दहा आगाऊ धनादेश आदेशाचे दिंनाका रोजी महानगरपालिकेत जमा करावेत.
3. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फि वसुली रकमेवर 18% जी. एस.टी आकारुन 10 समान हफ्त्यासह महापालिकेत जमा करावी.
4. करारनाम्यातील नमुद अन्य अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.
5. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.
6. बाजार हफ्ताची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पूर्ण अधिकार राहील. फेर लिलाव केल्यांनंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडुन (प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल ) करण्यात येईल.
7. महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरिता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फि वसुली करु नये.
8. बाजार हफ्त्याची रक्कम मुदतीत भरणा करण्यात 2 वेळा कराराचा भंग झाल्यास ठेका कोणताही पूर्व सूचना न देना रद्द करुन सुरक्षा अमानत रकमेतुन हफ्ता वसुल करुन घेण्यात येईल.
9. आपत्तीच्या काळातील बाजार फी वसुलीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांचे असतील.

वरील प्रमाणे पूर्तता करुन दि. 25-08-2022 पासुन लिलावाच्या कारारनाम्यातील अटी व शर्तीनुसार बाजार फी वसुल करावी.

(अजित मुठे )
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

बाजार विभाग
आवक क्र. ०६(मा-अ)
दि. २५।६।२३

जोडपत्र अ
पहा नियम (३) }

10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये, अर्ज.

प्रति,
राज्य जन माहिती अधिकारी,
( कार्यालयाचे नाव व पत्ता ) : बाजार विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव : संजय उदयकांत ठाकुर

२. पत्ता : ए 503, वृंदावन टॉवर, शांती पार्क, मिरा रोड पूर्व - 401107

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :
( एक ) माहितीचा विषय* : * दि- 19/01/2023 को मेरे द्वारा दिये शिकायत
( दोन ) माहितीशी संबंधित कालावधी # : पत्र तथा बाजार विभाग द्वारा दि- 24/04/23
(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन $ : को प्राप्त पत्र के ऊपर अवैध तरीके से बाजार विभाग के ठेके द्वारा ना फेरीवाला क्षेत्र * मे बैठे अवैध फेरीवालो पर क्या कार्यवाई कि गई लिखित रूप मे जानकारी दे.
(चार) माहिती टपालाव्दारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) : व्यक्तिशः
(पाच) टपालाव्दारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) लिफाफ्यात व स्पिड पोस्ट व्दारे : 30 दिवश

४. अर्जदार दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहे काय? (असल्यास, सोबत पुराव्याची छायांकित प्रत जोडावी) :

ठिकाण : भाईंदर पश्चिम

दिनांक : 15/06/2023.

[signature]

अर्जदाराची स्वाक्षरी
mo. 9224510043
( )

---

* विषयाचा स्थूल प्रवर्ग दर्शविण्यात यावा ( शासकीय जमीन देणे / सेवा बाबी / परवाने इत्यादी )
# ज्या कालावधी संबंधातील माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शविणे.
$ माहितीचा विशेष तपशील दर्शविणे आवश्यक आहे.

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

**स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग**
**भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/ बाजार/21 /2023-24** **दि.04/07/2023**

**प्रति,**

**श्री. संजय उदयकांत ठाकूर,**
ए 503, वृंदावन टॉवर, शांती पार्क,
मिरारोड (पुर्व) - 401107.

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.**
**संदर्भ :- 1. आपला दि. 19-06-2023 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**
**2. मनपा कडील जा.क्र.मनपा/बाजार/6/2023-24 दि. 12-05-2023 अन्वये दिलेले पत्र.**

उपरोक्त विषयान्वये या विभागाकडे माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला संदर्भ क्र. 1 अन्वये अर्ज प्राप्त झाला असुन अर्जातील नमूद प्रश्नाचे उत्तर आपणांस वरील संदर्भ क्र. 2 नुसार यापर्वूी देण्यात आलेले आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ना फेरीवाला क्षेत्रात / सार्वजनिक रस्त्यावर फेरीवाले बसल्यास त्यांचेवर महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकारी / फेरीवाला नियंत्रण पथक प्रमुख यांच्या नियंत्रणाखाली कारवाई करण्यात येत असते.

तरी देण्यात येत असलेल्या माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त (बाजार विभाग) तिसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात आपणास अपिल करता येईल.

**(संजय दोंदे)**
सहा.आयुक्त तथा जनमाहिती अधिकारी
(बाजार विभाग)
मिरा भाईंदर महानरपालिका

मिरा - भाईंदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आ. क्र. ९६५ (मा.अ.)
दाखल ता. २२/५/२३
आयुक्त
मि. भा. म.न.पा.

बाजार

सुचना का अधिकार अधिनियम २००५

नमूना पत्र क्रमांक ३

सुचना मिलने हेतु आवेदन का प्रपत्र

10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

**प्रति**

**जन सुचना अधिकारी**

मा. आयुक्त. मीरा भायंदर महानगर पालिका,

पालिका मुख्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन,

छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,

भायंदर (पश्चिम) ता. जि. ठाणे ४०१ १०१

बाजार विभाग
आवक क्र. ०३ (मा.अ.)
दि. २३.५.२०२३

**आवेदक का नाम** **श्री सुखदेव गुप्ता**

**आवेदक का पता** शॉप न. ११, ध्वनी हाइट बिल्डिंग, बेवरली पार्क, मीरा रोड (पूर्व) ४०१ १०७ मो. ९९३०५०१५३८

ई मेल bjp.sukhdevgupta@gmail.com

**सुचना से सम्बंधित कालावधी** २०१८-२०२३

**आवश्यक सुचना का विषय** मीरा भायंदर बाजार वसूली ठेके सम्बन्धी नियुक्त ठेकेदार से सम्बंधित जानकारी मिलने हेतु निवेदन

**आवश्यक सुचना का वर्णन**

- मीरा भायंदर महानगर पालिका में प्रभाग समिति वार बाज़ार वसूली हेतु नियुक्त ठेकेदार का नाम पता व संपर्क उपलब्ध करवाएं
- मनपा तथा ठेकेदार के मध्य हुए करार की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं वसूली ठेकेदार द्वारा मनपा के टेंडर नोटिस अंतर्गत लेटर ऑफ़ एक्सेप्टेंस, नोटिस टू प्रोसीड्स विथ दी वर्क, कोंट्राक्टरस टेक्नीकल एंड प्राइज बीड, टेंडर डोक्युमेंट, ड्राविंग्स, बिल ऑफ़ क्वांटीटिस , तथा टेंडर से जुड़े सभी आवश्यक दस्तावेजों की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं
- ठेकेदार द्वारा कामगार आयुक्त/ कामगार मंत्रालय महारष्ट्र शासन द्वारा निर्धारित ठेका कर्मचारियों के लिए न्यूनतम वेतन सहित स्वास्थ्य बीमा, कर्मचारी भविष्य निधि तथा सभी आवश्यक दिशा निर्देशों व सरकारी आदेशों की पालना सम्बन्धी व्यवस्थाओं से अवगत करवाएं, इस सम्बन्ध में उपलब्ध सभी शाशनादेश की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं

**सुचना किस माध्यम से चाहिए** व्यक्तिगत

**सुचना प्राप्त करने का प्रयोजन** लागु नहीं

**आवेदक गरीबी रेखा से निचे है अथवा नहीं** नहीं

**दिनाक :** १६/०५/२०२३

**आवेदक के हस्ताक्षर**

**स्थान :**मीरा रोड

# मिरा भाईदर महानगरपालिका
## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/ बाजार/09 /2023-24** **दि.30/5 /2023**

**प्रति,**

**श्री. सुखदेव गुप्ता,**
शॉप नं. 11, ध्वनी हाईट बिल्डींग,
बेवर्ली पार्क, मिरारोड (पुर्व) - 401107.

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत. मिरा-भाईंदर बाजार वसुली ठेके सम्बन्धी नियुक्त ठेकेदार से सम्बंधित जानकारी मिळणे हेतू निवेदन.**

**संदर्भ :- आपला दि. 22-05-2023 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज. (प्राप्त दि. 23-05-2023)**

उपरोक्त विषयान्वये या विभागाकडे माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला संदर्भिय अर्ज प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर पालिके में प्रभाग समिती दार बाजार वसुली हेतू नियुक्त ठेकेदार का नाम पता व संपर्क उपलब्ध करवाएं | **सन 2019 -** 1. मे आदिता इंटरप्रायजेस<br>पत्ता : अग्रवाल भवन, स्टेशन रोड, भाईंदर (प.)<br>2. श्री गजानन इंटरप्रायजेस,<br>पत्ता : ए/101 श्री गजानन प्रसन्न अपार्टमेंट, फाटकरोड, भाईंदर (प).<br>संपर्क क्र. - 8146144<br>**सन 2022** : श्री गजानन इंटरप्रायजेस,<br>पत्ता : ए/101 श्रीगजानन प्रसन्न अपार्टमेंट, फाटकरोड, भाईंदर (प).<br>संपर्क क्र. - 8146144 |
| 2. | मनपा तथा ठेकेदार के मध्य हुए करार की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं वसुली ठेकेदार द्वारा मनपा के टेंडर नोटीस अंतर्गत लेटर ऑफ एक्सेप्टेंस, नोटीस टू प्रोसिड्स विथ दी वर्क, कोंट्राक्टरस टेक्नीकल एंड प्राईज बीड, टेंडर डोक्युमेंट, ड्राविंग्स, बिल ऑफ क्वांटिटिस, तथा टेंडर से जुडे सभी आवश्यक दस्तावेजों की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं | सदरची माहिती ही विस्तृत स्वरूपाची असल्याने आपणांस आवश्यक असलेली कागदपत्रांच्या छायांकित प्रती (प्रत रू.2/- प्रमाणे मनपा फंडात जमा करून)/ आपण सुचविलेल्या अभिलेख त्वरीत आपणांस छायांकित प्रती काढून देण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| 3. | ठेकेदार द्वारा कामगार आयुक्त/ कामगार मंत्रालय महाराष्ट्र शासन द्वारा निर्धारित ठेका कर्मचाारियों के लिए न्युनतम वेतन सहित स्वास्थ्य बीमा, कर्मचारी भविष्य निधी तथा सभी आवश्यक दिशा निर्देशों व सरकारी आदेशों की पालना संम्बन्धी व्यवस्थाओं से अवगत करवाएं, इस सम्बन्ध में उपलब्ध सभी शाशनादेश की छायांकित प्रतियां उपलब्ध करवाएं | याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याने व संबंधित ठेकेदारानी करारनाम्यातील कोणत्याही अटींचा भंग केला नसल्याने या प्रकरणी माहिती निरंक आहे. |

तरी आपण मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे तपासण्या करीता आपण दिनांक व वेळ कळविल्यास आपणांस अभिलेख उपलब्ध करून देण्यात येईल. तरी आपण कृपया आपली वेळ व दिनांक कळवावे, ही विनंती.

तसेच देण्यात येत असलेल्या माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त (बाजार विभाग) तिसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात आपणास अपिल करता येईल.

**सहा.आयुक्त तथा जनमाहिती अधिकारी**
(बाजार विभाग)
मिरा भाईंदर महानरपालिका

भारतीय डाक
EM192275390IN IVR:69771922753
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1,01/06/2023,10:18
To:SHUKHDEV,,
PIN:401107, Mira Road S.O
From:MBMC,,
Wt:20gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 18002666868> <Wear Masks. Stay Safe>
India Post